# शौर्य मराठी

महाराष्ट्राचे निडर दैनिक

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | बुधवार, दि. १८ फेब्रुवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक १०० किंमत : ५ रु. | पाने ४


## दिन विशेष...

१४८६ : बंगालमधील थोर संत चैतन्य प्रभू यांचा जन्मदिन.
१८२३ : लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांचा जन्मदिन.
१९०५ : भारतीय होमरूल सोसायटीची लंडन येथे शामजी कृष्ण वर्मा यांनी स्थापना केली.
१९२६ : हॉकी खेळाडू नंदीसिंह यांचा जन्मदिन.

सेन्सेक्स ८३,४५०.९६ +१७३.८१ (०.२१%)
डॉलर ₹ ९०.६९

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३५ | २० |
| दिल्ली | २७ | १६ |
| मुंबई | ३० | २१ |
| नागपूर | ३२ | १६ |
| पुणे | ३२ | १४ |

## सुविचार

प्रत्येक अपयश हे यशाच्या दिशेने एक पाऊल आहे; ते स्वीकारा आणि पुढे चाला.

सूर्योदय - सूर्यास्त
स.-६:५६ संध्या-६:२७

**सोने – चांदी**
सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,५५,९५५/- २,६०,०००/-

**केळी भाव**
नवती : १३५५ ते १३६०
पिल बाग : ११०१ ते ११०२
कांदे बाग : ----

# भारत-फ्रान्समध्ये विशेष जागतिक भागीदारी

## इमॅन्युएल मॅक्रोन यांच्या बैठकीनंतर मोदींची घोषणा

वृत्तसंस्था । मुंबई

**फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रोन तीन दिवसीय भारत भेटीवर आले असून आज ते मुंबईत आहेत. यानिमित्ताने भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदीही आज मुंबईत आले होते. या दोन्ही वरिष्ठ नेत्यांमध्ये द्विपक्षीय बैठक झाली. या बैठकीत दोन्ही देशातील व्यापारवृद्धीवर चर्चा करण्यात आली. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी माध्यमांना संबोधित केले. यावेळी त्यांनी भारत आणि फ्रान्स यांच्यातील 'विशेष जागतिक धोरणात्मक भागीदारी'ची घोषणा केली.**



पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, 'भारत आणि फ्रान्स भारतात माउंट एव्हरेस्टच्या उंचीवर उडण्यास सक्षम असलेले जगातील एकमेव हेलिकॉप्टर तयार करतील आणि ते जागतिक स्तरावर निर्यात केले जातील. भारत-फ्रान्स भागीदारीला कोणत्याही सीमा नाहीत. या दोन्ही देशातील भागीदारी खोल महासागरांपासून सर्वात उंच पर्वतांपर्यंत पसरलेली असेल. जग अनिश्चिततेच्या काळातून जात असताना, भारत-फ्रान्स भागीदारी जागतिक स्थिरतेसाठी एक शक्ती बनेल, असे ते म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, भारत-फ्रान्सच्या द्विपक्षीय संबंधात संरक्षण, स्वच्छ ऊर्जा, अवकाश आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानातील सहकार्यावर भर दिला जाईल. त्यांनी नमूद केले की हा उपक्रम उद्योग, स्टार्टअप आणि एमएसएमई यांना जोडेल. विद्यार्थी आणि संशोधकांमधील देवाणघेवाणीला प्रोत्साहन देईल आणि फ्रान्ससोबत संयुक्त करारासाठी नवीन केंद्रे स्थापन करेल. (पान २ वर)

### ➤ इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी मानले आभार

**फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले आणि द्विपक्षीय संबंधांना 'उल्लेखनीय आणि अद्वितीय' असं वर्णन केले. ते म्हणाले की, दोन्ही राष्ट्रांनी त्यांचे संबंध विश्वास, मोकळेपणा आणि महत्त्वाकांक्षेवर आधारित विशेष धोरणात्मक भागीदारीकडे नेण्याचा निर्णय घेतला आहे. भारत-फ्रान्स नवोन्मेष वर्ष २०२६ निमित्त मॅक्रॉन यांचा हा चौथा भारत दौरा आहे आणि मुंबईला त्यांचा पहिलाच दौरा आहे. हा दौरा दोन्ही राष्ट्रांमधील वाढत्या धोरणात्मक आणि तांत्रिक भागीदारी मजबूत करेल.**

# भुसावळ-दादर विशेष रेल्वे गाड्यांना मार्चपर्यंत मुदतवाढ

• उत्तर महाराष्ट्रातील प्रवाशांना मिळाला दिलासा

प्रतिनिधी । जळगाव



**पश्चिम रेल्वेने प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेऊन भुसावळदादर मार्गावरील विशेष गाड्यांना पुन्हा एकदा काही दिवसांसाठी मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे उत्तर महाराष्ट्रातील भुसावळहून जळगाव, धरणगाव, अमळनेर, शिंदखेडा, दोंडाईचा आणि नंदुरबारमार्गे मुंबईकडे प्रवास करणाऱ्या प्रवाशांची सोय होणार आहे.**

मध्य रेल्वेच्या भुसावळजळगावमनमाडनाशिकमुंबई मार्गावर अनेक लांबपल्ल्याच्या गाड्या धावतात. मात्र, भुसावळहून जळगाव, अमळनेर, नंदुरबारमार्गे मुंबईकडे थेट गाडी उपलब्ध नव्हती. त्यामुळे प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. या पार्श्वभूमीवर जून २०२४ मध्ये पश्चिम रेल्वेने नंदुरबारदादर दरम्यान विशेष गाडी सुरू करण्याचा निर्णय घेतला. मात्र, ही गाडी नंदुरबारऐवजी भुसावळ स्थानकातून सुरू करण्यात यावी, अशी जोरदार मागणी खान्देशातील प्रवाशांनी केली. या मागणीसाठी जळगावच्या खासदार स्मिता वाघ यांनीही रेल्वे प्रशासनाकडे पत्रव्यवहार करून पाठपुरावा केला.

त्यानुसार, प्रवाशांच्या मागणीला अखेर यश आले. आणि दादरभुसावळ (०९०५१) तसेच भुसावळदादर (०९०५२) या त्रिसाप्ताहिक विशेष गाड्या सोमवार, बुधवार आणि शनिवारी धावण्यास सुरुवात झाली. यासोबतच दादरभुसावळ (०९०४९) आणि भुसावळदादर (०९०५०) ही साप्ताहिक विशेष गाडी दर शुक्रवारी धावू लागली. या निर्णयामुळे जळगाव, धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यातून मुंबईपर्यंतचा प्रवास अधिक सुलभ आणि सोयीस्कर झाला. भुसावळदादर (पान २ वर)

## थोडक्यात

### सुनेत्रा पवार राष्ट्रवादीच्या नव्या राष्ट्रीय अध्यक्ष

**मुंबई ।** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात (अजित पवार गट) एक महत्त्वपूर्ण नेतृत्व बदल घडत आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदावर नेमण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. पक्षाचे राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी एका महत्त्वपूर्ण बैठकीत सुनेत्रा पवार यांच्या नावाची राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून घोषणा केली असून, विश्वसनीय सूत्रांच्या माहितीनुसार ही घोषणा देवगिरी येथे पार पडलेल्या बैठकीत करण्यात आली आहे.

### भारताविरुद्धच्या पराभवानंतर पाकिस्तानी चाहते संतापले

**कराची ।** टी-२० विश्वचषक मध्ये पाकिस्तानचा ६१ धावांनी धुव्वा उडाल्यानंतर, पाकिस्तानात संतापाचा उद्रेक पाहायला मिळाला. मैदानात पाकिस्तानी खेळाडूंनी नांगी टाकल्यानंतर, पाकिस्तानी चाहत्यांनी रस्त्यावर उतरून आपला राग व्यक्त केला. नेहमीप्रमाणे सामन्यानंतर पाकिस्तानात टीव्ही फुटण्याच्या बातम्या आल्या, मात्र यावेळेस चाहत्यांच्या आक्रमकतेने सर्व मर्यादा ओलांडल्याचे चित्र व्हायरल झाले आहे.

# 'लालपरी'च्या सुरक्षेला आता अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे बळ : परिवहन मंत्री

• एसटीच्या बसस्थानकांपासून ते विभागीय कार्यालयांपर्यंत विनले जाईल सीसीटीव्हीचे जाळे

वृत्तसंस्था । मुंबई

कानाकोपऱ्यात धावणाऱ्या 'लालपरी'च्या सुरक्षेला आता अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे बळ मिळणार आहे. दहशतवादी आणि समाजविघातक प्रवृत्तींच्या संभाव्य धोक्यांचा विचार करून राज्य परिवहन (एसटी) महामंडळाने एक महत्त्वाकांक्षी 'नवीन सीसी टीव्ही कॅमेरा प्रकल्प' हाती घेतला. या प्रकल्पाच्या माध्यमातून एसटीच्या बसस्थानकांपासून ते विभागीय कार्यालयांपर्यंत सर्व महत्त्वाच्या ठिकाणी सीसी टीव्ही कॅमेऱ्यांचे जाळे उभारण्यात येणार आहे, अशी माहिती परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.



प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत राज्य शासनाने या प्रकल्पासाठी तब्बल १११ कोटी रुपये निधी उपलब्ध केला आहे. या निधीच्या सहाय्याने एसटीची बस स्थानके, आगार, विभागीय कार्यशाळा, मध्यवर्ती कार्यशाळा, विभागीय कार्यालये; तसेच मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था भोसरी यासारख्या संवेदनशील ठिकाणी सीसी टीव्ही कॅमेरे बसविण्याचे नियोजन केले आहे. एकूण ६३३ ठिकाणी तब्बल ७,०३५ सीसी टीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार असून, यामुळे या ठिकाणच्या प्रत्येक हालचालीवर सतत नजर राहणार आहे, असे सरनाईक म्हणाले. या अत्याधुनिक प्रकल्पाची जबाबदारी ई-निविदा प्रक्रियेद्वारे निवडलेल्या (पान २ वर)

## रावी नदीवरील धरण पूर्णत्वाकडे

# पाकिस्तान मार्चपासून पाण्यासाठी तडफडणार!




वृत्तसंस्था । पठाणकोट

**गेल्या वर्षी जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर, भारताने पाकिस्तानविरुद्ध सातत्याने कठोर भूमिका स्वीकारली आहे. भारतीय सैन्याने ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तानात लपलेल्या दहशतवाद्यांना योग्य उत्तर दिले आणि त्यानंतर मोदी सरकारने सिंधू पाणी करार नाकारला.**

भारताने आता रावी नदीच्या पाण्याबाबत एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. पूर्वी पाकिस्तानला जाणारे रावी नदीचे पाणी आता भारतात वापरले जाईल. हा बदल शाहपूर कांदी धरणाच्या बांधकामाद्वारे साध्य केला जाणार आहे. सरकारच्या मते, शाहपूर कांदी धरणाचे काम अंतिम टप्प्यात आहे आणि मार्च २०२६ पर्यंत ते पूर्णपणे कार्यान्वित होईल. यानंतर, रावी नदीचे पाणी आता सीमा ओलांडून जाणार नाही तर ते भारतीय शेतकऱ्यांच्या हितासाठी वापरले जाईल. या प्रकल्पामुळे जम्मू आणि काश्मीरमधील कठुआ आणि सांबा जिल्ह्यातील सुमारे ३२ हजार हेक्टर जमिनीला सिंचनाचे पाणी मिळेल. पंजाबमधील हजारो (पान २ वर)

# ग्रामीण भागात उत्कृष्ट मैदान असल्याची उधळली स्तुतिसुमने

## एसएमबीटी क्रिकेट कार्निव्हल २०२६ चे मिथाली राजच्या हस्ते उद्घाटन




प्रतिनिधी । नाशिक

**एसएमबीटी क्रिकेट कार्निव्हल २०२६ ची ३६ पेक्षा अधिक संघ, ५५० हून अधिक खेळाडू आणि महिलांचे स्वतंत्र ८ संघ इतक्या मोठ्या संख्येने उत्स्फूर्त सहभागात दिमाखदार सुरुवात झाली.**

भारतीय महिला क्रिकेट संघाची माजी कर्णधार व दिग्गज क्रिकेटपटू मिथाली राज यांच्या उपस्थितीत एसएमबीटी क्रिकेट कार्निव्हलचे उद्घाटन झाले. ग्रामीण भागातील हे अतिशय उत्कृष्ट असे मैदान असल्याचे त्या म्हणाल्या. एसएमबीटीमधील प्रत्येक सदस्याच्या चेहऱ्यावरील हास्य आणि उत्साह पाहून मला पुन्हा एकदा सकाळच्या सुमारास क्रिकेटच्या मैदानात येण्याचा आनंद झाल्याचे सांगत क्रिकेट हा केवळ खेळ नसून व्यक्तिमत्व घडवणारा प्रवास असल्याचे मिथाली राज म्हणाल्या. याप्रसंगी संस्थेचे व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. हर्षल तांबे यांच्यासह शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

मिथाली राज याप्रसंगी म्हणाल्या की, मला माझं कॉलेज लाईफ पूर्णपणे एन्जॉय करता आले नाही, कारण त्या काळात मी क्रिकेटमुळे सतत प्रवास आणि सरावात व्यस्त होते. पण इथल्या विद्यार्थ्यांना एकत्र खेळताना पाहून खूप समाधान वाटले. भविष्यातील डॉक्टर्स आज इथे क्रिकेटमुळे एकत्र आलेले दिसून येत आहेत. या कार्निव्हलमधील महिलांच्या आठ संघांचा सहभाग असल्याचे त्यांना समजल्यानंतर त्यांनी कौतुकाने महिला आज कुठल्याही क्षेत्रात पाठीमागे नसल्याचे नमूद केले.

मैदानावर खेळताना आम्ही देशासाठी खेळत असतो; आणि इथले विद्यार्थी उद्या समाजासाठी काम करणार आहेत. मैदानावर जिंकण्यासाठी जशी शिस्त, सातत्य आणि मानसिक ताकद आवश्यक असते, तशीच ती आयुष्यासह वैद्यकीय क्षेत्रातही महत्त्वाची आहे. इथल्या विद्यार्थ्यांना एकत्र खेळताना आणि उत्साहाने सहभागी होताना पाहून खूप समाधान वाटत असल्याचे मिथाली राज म्हणाल्या. सर्वांच्या उपस्थितीत त्यांनी मैदानासह खेळाडूंच्या टीम्सची पाहणी केली. त्यानंतर अनेक विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या पोस्टर्सवर ऑटोग्राफ देत आभार व्यक्त केले.

त्यांनी विद्यार्थ्यांना स्वतःच्या यशाची व्याख्या शोधण्याचा, जीवनात संतुलन राखण्याचा आणि नियमित शारीरिक सदृढतेचे महत्त्व लक्षात ठेवण्याचा संदेश दिला.

### ➤ ग्रामीण भागातील उत्तम क्रीडांगण

मी अनेक भागात वेगवेगळ्या कार्यक्रमांच्या निमित्ताने जात असते. परंतु येथील मैदानासारखे मैदान कुठेही दिसले नाही. मैदान चांगले राखण्यासाठी देखभाल गरजेची असते. ती तुम्ही याठिकाणी उत्तमरीत्या केलेली असल्याने नक्कीच येथील विद्यार्थ्यांना आणि कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन मिळेल.

**– मिथाली राज**
माजी कर्णधार,
भारतीय महिला क्रिकेट संघ

विशेषतः वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत असणाऱ्यांसाठी तंदुरुस्त शरीर आणि शांत मन किती आवश्यक आहे, हे त्यांनी अधोरेखित केले. एसएमबीटी क्रिकेट कार्निव्हल हा केवळ क्रीडा स्पर्धांचा मेळा नसून तो एकतेचा, संघभावनेचा आणि सकारात्मक ऊर्जेचा उत्सव असल्याचे नमूद करत असे कार्यक्रम अविरत ठेवण्यासाठी दूरदृष्टी आणि ध्येय महत्वाचे असल्याचेदेखील त्या म्हणाल्या. प्रारंभी, मिथाली राज यांनी एसएमबीटी शैक्षणिक संकुलातील काही विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला. या (पान २ वर)

## मुंबईजवळ समुद्रात कोस्ट गार्डची धाडसी कारवाई

वृत्तसंस्था । मुंबई

येथील समुद्रात खनिज तेलाची वाहतूक करणारे तीन टँकर्स जप्त करण्यात आले आहेत. या कारवाईमुळे खळबळ उडाली आहे. या टँकर्सशी आपला संबंध नसल्याचं इराणनं सांगितलं आहे. आंतरराष्ट्रीय समुद्र क्षेत्रात भारतीय तटरक्षक दलानं मोठी कारवाई करत तीन संशयास्पद जहाजं पकडली आहेत. आंतरराष्ट्रीय समुद्रात तेलाची तस्करी करणारी तीन जहाजं ताब्यात घेण्यात आली आहेत. या कारवाईनं मोठी खळबळ उडाली आहे. तेल टँकर्स रोखण्यात आले. भरसमुद्रात ही धाडसी कारवाई करण्यात आली.

# बीडमध्ये पाच शिक्षक निलंबित

• बारावीच्या परीक्षेत कॉपी करण्यास मदत



वृत्तसंस्था । बीड

जिल्ह्यातील एका केंद्रावर बारावीच्या परीक्षेच्या पेपरमध्ये मोठ्या प्रमाणात कॉपी करण्यास मदत करणाऱ्या पाच शिक्षकांना निलंबित करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने चौसाळा येथील केंद्र २२४ येथे घेतलेल्या बारावीच्या परीक्षेच्या पहिल्या दिवशी १० फेब्रुवारी रोजी ड्रोन कॅमेऱ्याने मोठ्या प्रमाणात कॉपी केल्याचे उघडकीस आल्यानंतर पोलिसांनी १७ शिक्षकांविरुद्ध एफआयआर नोंदवला आहे. (पान २ वर)

# संपादकीय

## महागाईचे मोजमाप !

महागाईची मोजणी करण्याच्या पद्धतीत बदल झाल्यामुळे, अर्थव्यवस्थेतील बदलांचे अधिक ठळक प्रतिबिंब पडेल. धोरणविषयक प्रतिसादात त्यामुळे अचूकता येण्याची शक्यता आहे. जानेवारी २०२६ मधील नवीन आकडेवारीनुसार, भारतातील वार्षिक किरकोळ महागाईदर २.७५ टक्के इतका आहे. त्यापैकी अन्नधान्याची भाववाढ २.१३ टक्के आहे. घाऊक महागाईदर १.८१ टक्क्यांवर पोहोचला असून, दहा महिन्यांतील हे सर्वाधिक प्रमाण आहे. नव्या आकडेवारीत अन्नधान्याचे वेटेज कमी करण्यात आले आहे. निर्देशांक मोजण्याच्या प्रक्रियेत आता घरगुती, आरोग्य, वाहतूक आणि मनोरंजनाच्या खर्चाचा समावेश सुधारित पद्धतीने करण्यात आला आहे. सध्या भाज्या, इंधन आणि सोन्या-चांदीच्या किमतीत वाढ झाल्यामुळे महागाईत भर पडली आहे. देशाच्या स्थूल अर्थशास्त्रीय सूचकांकांचे (इंडिकेटर) अद्ययावतीकरण करण्यात भाग म्हणून, राष्ट्रीय संख्याशास्त्रीय कार्यालयाने चलनफुगवट्याची नवीन मालिका प्रसिद्ध केली आहे. यानंतर ठोकळ राष्ट्रीय उत्पादनाची मालिकाही प्रसृत केली जाणार आहे. मे महिन्यात औद्योगिक उत्पादनाचा नवा निर्देशांक जनतेसमोर येईल. नवनवीन स्रोतांमधून माहिती गोळा करणे आणि पाहणीचे क्षेत्र वाढवणे, हा हेतू मनात बाळगून नवीन मालिका आणल्या जात आहेत. देशाचे बदलते आर्थिक वास्तव अधिक प्रभावीपणे प्रतिबिंबित व्हावे, हा यामागील उद्देश आहे. तो स्वागतार्हच म्हणावा लागेल. चलनवृद्धीच्या मापनासाठी आता २०२४ हे पायाभूत वर्ष मानले जाणार आहे. सन २०२३-२४ मधील घरगुती उपभोग पाहणीची आकडेवारी आहे, त्याआधारे निर्देशांकातील वस्तूंची निवड तसेच त्यांचे भारांक हे निश्चित करण्यात आले आहेत. अगोदरच्या मालिकाचा आधार २०१२ हा होती. त्यासाठी २०११-१२ ची उपभोगविषयक आकडेवारी ग्राह्य धरण्यात येत होती. परंतु त्यानंतरच्या काळात घरगुती उपभोगाच्या खर्चाच्या धाटणीत बराच बदल झालेला आहे. सर्वसामान्य जनतेची क्रयशक्ती वाढली असून, त्यामुळे एकूण उत्पन्नातील अन्नावरील खर्चाचे प्रमाण आता कमी झाले आहे. उत्पन्नातील जास्त वाटा हा प्रत्येकजण आपापल्या प्राधान्यानुसार करू लागला आहे. त्याच्या परिणामी अन्न आणि पेये यावरील भारांक ४५.८६ टक्क्यांवरून ३६.७५ टक्क्यांवर आला आहे. ०-१५ वर्षांपूर्वीच्या काळात अन्नधान्यांच्या किमतीत प्रचंड चढ-उतार होत असत. अगोदरच्या मालिकेत ग्राहक अन्न किंमत निर्देशांक जुलै २०२४ मध्ये ५.४ टक्के होता, तो ऑक्टोबर २०२४ मध्ये १०.८ वर गेला आणि परत नोव्हेंबर २०२५ मध्ये तो उणे ३.९ टक्क्यांवर आला. हेडलाइन इन्फ्लेशन, म्हणजे संपूर्ण अर्थव्यवस्थेतील भाववाढीचे प्रमाण. त्यात अन्नधान्य आणि इंधन वगैरे सर्व खर्चांचा समावेश होतो. या अगोदरच्या मालिकेत हे चढ-उतार मोठ्या प्रमाणात दिसत असत. परंतु आता अन्नधान्यावरील भारांक घटवण्यात आल्यामुळे, या चढ-उतारांचा फारसा परिणाम दिसणार नाही. आता चलनवाढीच्या मोजणीच्या स्वरूपात मूलगामी फरक झाल्यामुळे चलननीतीमध्येही त्यानुसार फेरफार करावे लागतील. रिझर्व्ह बँकेची मॉनेटरी पॉलिसी कमिटी काम करते.

# छत्रपती शिवाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा बसवा

## श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानतर्फे नगराध्यक्ष सुनील काळे यांना निवेदन

प्रतिनिधी । वरणगाव

**शहरातील जुन्या नगरपरिषदजवळ असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांचा अर्धाकृती पुतळा आहे. त्याठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा बसवा, अशी मागणी श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान वरणगावतर्फे दि. १६ रोजी नगराध्यक्ष सुनील काळे यांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज हे संपूर्ण देशासाठी आदर्श आहेत. वरणगाव शहरात जुन्या नगरपपरिषदजवळ असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांचा अर्धाकृती पुतळा आहे. त्याठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा बसविण्यात यावा, अशी मागणी श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान शाखेच्यावतीने करण्यात आली आहे.




**गावात पूर्णाकृती पुतळ्यामुळे वाढेल शोभा**

सध्या असलेला अर्धाकृती पुतळा हा पूर्णाकृती केल्यास वरणगाव शहराची शोभा तर वाढेलच. परंतु, युवकांना छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास समजून त्यांच्याकडून प्रेरणा घेण्यासाठी अधिक प्रोत्साहन मिळेल, अशी भावना युवकांनी व्यक्त केली आहे. यावेळी श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान वरणगाव शाखाध्यक्ष गौरव माळी, गोलू माळी, मनीष झांबरे, सूरज माळी, युवराज जैन, विकी माळी, पप्पू माळी, गोलू चौधरी, शुभम माळी, यश सोनार यांच्यासह इतर धारकरी आणि शिवभक्त उपस्थित होते.

## नंदुरबारात गाडगेबाबांची १५० वी जयंती साजरी

प्रतिनिधी । नंदुरबार

शहर परीट (धोबी) सेवा मंडळाच्या वतीने संत शिरोमणी श्री. गाडगेबाबा यांची तिथीप्रमाणे १५०वी जयंती साजरी करण्यात आली. नंदुरबार शहर उपाध्यक्ष भास्कर सोनवणे यांच्या निवासस्थानी संत श्री.गाडगेबाबांचा प्रतिमेचे पूजन शहराध्यक्ष बाबुलाल बोरसे, किशोर रामचंद्र यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी महेंद्र बोरसे, रमेश मोरे, अर्जुन भिलाणे, अरुण सोनवणे, भास्कर सोनवणे, सुनिता धोबी, वनिता बोरसे, अनिल बच्छाव, वासुदेव बोरसे, किरण कुवर, नामदेव सोनवणे, शितल डिगराळे, मीनाबाई सोनवणे, सुनंदा बोरसे, डॉ. विकास सपकाळे, जयश्री सपकाळे, मयुर सोनवणे उपस्थित होते.

## छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याचे आज अनावरण

प्रतिनिधी । धुळे

**तालुक्यातील आदर्श गाव बोरकुंड येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा आकारास आला असून या शिवस्मारकाचा भव्य अनावरण सोहळा दि.१८ फेब्रुवारी रोजी दुपारी २ वाजता होत आहे.**

यावेळी क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले यांच्या स्मारकाचा पायाभरणी समारंभही संपन्न होईल. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल हे राहतील. राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगनराव भुजबळ यांच्या हस्ते शिवस्मारकाचे अनावरण होईल.

# जामनेर रोडचे चौपदरीकरण ठप्प; निकृष्ट कामामुळे संताप

## एकेरी वाहतुकीमुळे अडथळे, अपघाताचा वाढता धोका; चौकशीची मागणी

प्रतिनिधी । भुसावळ

**शहरातील प्रमुख समजल्या जाणाऱ्या जामनेर रोडवरील चौपदरीकरण व कॉंक्रिटीकरणाचे काम गेल्या सहा महिन्यांपासून ठप्प असल्याने वाहनधारक व नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. सीआरएफ व हायब्रीड ॲन्युइटी योजनेंतर्गत सुरू असलेल्या या प्रकल्पामुळे सध्या एकेरी वाहतूक सुरू आहे. त्यामुळे वाहतुकीत अडथळे निर्माण होत आहेत. अपूर्ण कामामुळे अपघाताचा धोका वाढल्याची भीतीही व्यक्त केली जात आहे.**



या प्रकल्पांतर्गत नाहाटा चौफुली ते जामनेर शहर या मार्गाचे रुंदीकरण व मजबुतीकरण करण्यात येत आहे. विशेषतः गजानन महाराज मंदिर ते चोरवड गावापर्यंतचा (राज्य सीमा विटवा-भुसावळ-जामनेर मार्ग ४४/५०० ते ५८/१००) सुमारे २५ कोटी रुपयांचा टप्पा अपूर्ण आहे. तसेच यावल रोड, गांधी पुतळा ते गजानन महाराज मंदिर (४५/२०० ते ७५/५००) या भागासाठी १८२ कोटी रुपयांचा निधी मंजूर आहे.

पूर्वीचा कॉंक्रीट रस्ता रुंद करण्यात आला असला तरी गजानन महाराज मंदिर ते चोरवड हा भाग अर्धवट अवस्थेत आहे. एका बाजूचे काम अपूर्ण असल्याने संपूर्ण वाहतूक एकाच बाजूने वळविण्यात आली आहे. त्यामुळे मोठ्याप्रमाणात धूळ उडत आहे. दुचाकीस्वारांना विशेषतः त्रास सहन करावा लागत आहे. वाहने वळवताना गोंधळ उडत असून, किरकोळ अपघाताच्या घटना घडत असल्याचे नागरिकांनी सांगितले.

दोन महिन्यांपूर्वी साईबाबा मंदिरासमोरील काही भागाचे कॉंक्रिटीकरण करण्यात आले होते. मात्र वापरलेल्या साहित्याच्या गुणवत्तेवर प्रश्न उपस्थित होत आहेत. नव्याने केलेल्या रस्त्यावरील खडी बाहेर पडू लागल्याने त्या ठिकाणी आता डांबराचे ठिगळ लावण्याचे काम सुरू आहे. यामुळे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. काम अत्यंत संथगतीने सुरू आहे. रोजच्या वाहतुकीत प्रचंड त्रास सहन करावा लागतो. निकृष्ट कामामुळे शासनाचा निधी वाया जात आहे. प्रशासनाने तातडीने चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.

# पान १ वरुन

**भुसावळ-दादर विशेष......**

दरम्यान आठवड्यातून चार दिवस धावणाऱ्या विशेष रेल्वे गाड्यांना प्रवाशांचा वाढता प्रतिसाद लक्षात घेता यापूर्वी पाच वेळा मुदतवाढ देण्यात आली आहे. अखेरची मुदतवाढ २८ फेब्रुवारीला संपणार असल्याने पश्चिम रेल्वे प्रशासनाकडून पुन्हा मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार, दादरभुसावळ (०९०४९ ) आणि भुसावळ-दादर (०९०५०) दरम्यान आठवड्यातून एक दिवस दर शुक्रवारी धावणाऱ्या साप्ताहिक विशेष गाडीचा कालावधी २७ मार्च २०२६ पर्यंत वाढविण्यात आला आहे. याशिवाय दादर-भुसावळ (०९०५१) आणि भुसावळदादर (०९०५२) दरम्यान आठवड्यातून तीन दिवस सोमवार, बुधवार आणि शनिवारी धावणाऱ्या त्रिसाप्ताहिक विशेष रेल्वे गाड्यांचा कालावधी २८ मार्चपर्यंत वाढविण्यात आला आहे.

**पाकिस्तान मार्चपासून......**

शेतकऱ्यांनाही याचा फायदा होईल. आतापर्यंत या भागातील पिके पाण्याच्या कमतरतेमुळे अनेकदा वाया जात होती, परंतु धरणाच्या कार्यान्विततेमुळे ही समस्या लक्षणीयरीत्या कमी होईल. पूर्वी पाणी का वाहून जात असे? - रावी नदी ही भारताच्या नद्यांपैकी एक आहे ज्यावर भारताचा पूर्ण अधिकार आहे. तथापि, पूर्वी, पाणी संवर्धन आणि योग्य वापरासाठी अपुरी व्यवस्था होती. परिणामी, दरवर्षी मोठ्या प्रमाणात पाणी पाकिस्तानात वाहून जात असे. शाहपूर कांडी धरण पूर्ण झाल्यानंतर, भारत आता आपल्या वाट्याचे पाणी पूर्णपणे वापरू शकेल, ज्यामुळे पाकिस्तान गोंधळात पडेल. या धरणामुळे केवळ शेतीला फायदा होणार नाही तर जलसंवर्धनातही सुधारणा होईल. यामुळे या प्रदेशाच्या विकासाला गती मिळेल आणि भविष्यातील वीज निर्मितीची क्षमता वाढेल. यामुळे स्थानिक लोकांना रोजगाराच्या संधी देखील उपलब्ध होऊ शकतात. भारताच्या या निर्णयामुळे पाकिस्तान पाण्याच्या प्रत्येक थेंबासाठी हताश होईल. तो आधीच पाण्याच्या संकटाशी झुंजत आहे.

**बीडमध्ये पाच शिक्षक ......**

अधिकाऱ्यांनी तैनात केलेल्या ड्रोन कॅमेऱ्यांमध्ये १६ परीक्षा हॉलमध्ये पर्यवेक्षक कॉपी रोखण्याऐवजी विद्यार्थ्यांना उघडपणे कॉपी करण्यास मदत करत असल्याचे दिसले आहे. याप्रकरणी लिंबागणेश येथील भालचंद्र विद्यालयातील पाच शिक्षकांना निलंबित करण्यात आले. इतर तीन शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयातील १२ शिक्षकांची चौकशी सुरू आहे. या प्रकाराची माहिती मिळताच बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी या चुकीसाठी जबाबदार असलेल्यांवर कडक कारवाई करण्याचे आदेश दिले.त्यानुसार, नेकनूर पोलिस ठाण्यात परीक्षा केंद्राच्या मुख्य संचालकासह १७ शिक्षकांविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात आला. त्यानंतर शिक्षण विभागाने संबंधित संस्थांना संबंधित कर्मचाऱ्यांना निलंबित करण्याचे निर्देश दिले.

**ग्रामीण भागात उत्कृष्ट......**

संवादात त्यांनी घरातल्या व्यक्तींनी कशापद्धतीने प्रोत्साहित केले. यांसह मुलगी म्हणून क्रिकेट जीवनातील अनेक पैलू उलगडले. शिक्षण घेत असताना छंद कसे जोपासावेत यावरही त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. एसएमबीटीत दरवर्षी क्रिकेट कार्निव्हलचे आयोजन केले जाते. याआधी जहीर खान, इरफान पठाण, अजिंक्य रहाणे व हरभजन सिंग क्रिकेट कार्निव्हलच्या उद्घाटनासाठी येऊन गेले आहेत. त्यामुळे यावर्षी नेमके कोण येणार याबाबत उत्कंठा शिगेला पोहोचली होती. दरम्यान, जेव्हा यावर्षी महिला क्रिकेटपटू यावर्षी येणार आहे त्यानंतर मात्र सर्वांनाच या क्रिकेट कार्निव्हलचे आकर्षण अधिकच वाढले होते. एसमबीटी व्यवस्थापन मनोरंजनाच्या माध्यमातून आपापसातील संबंध दृढ व्हावेत, एका व्हिजनने काम करत असताना ते अधिक चांगल्या प्रकारे कसे करता येईल यासाठी प्रयत्नशील असत

**भारत-फ्रान्समध्ये विशेष......**

मॅक्रॉन यांनी इंडो-पॅसिफिकमधील सहकार्य, तंत्रज्ञान आणि नियम-आधारित व्यवस्थेवर प्रकाश टाकला आणि आयएमईसी कॉरिडॉर, कृत्रिम बुद्धिमत्ता सहकार्य आणि आंतरराष्ट्रीय सौर आघाडी यासारख्या संयुक्त उपक्रमांचा उल्लेख केला, असे नमूद करून की गेल्या आठ वर्षांत दोन्ही देशांनी एकत्रितपणे नवीन मार्ग शोधले आहेत.

**'लालपरी'च्या सुरक्षेला......**

टेलिकम्युनिकेशन कन्सल्टंट इंडिया लिमिटेड (टीसीआयएल) या संस्थेकडे सोपवली आहे. त्यांच्या माध्यमातून प्रकल्पाची अंमलबजावणी वेगाने आणि प्रभावीपणे सुरू असून, या प्रकल्पाचा एकूण कालावधी एक वर्ष निश्चित केला आहे. या प्रकल्पाचा मुख्य कणा ठरणारे मध्यवर्ती नियंत्रण कक्ष मुंबई येथे उभारण्यात आले असून, त्याची वापरकर्ता स्वीकृती चाचणी (यूएटी) यशस्वीरित्या पूर्ण झाली आहे. या नियंत्रण कक्षातून राज्यभरातील सीसी टीव्ही कॅमेऱ्यांवर केंद्रीकृत पद्धतीने लक्ष ठेवले जाणार आहे. त्यामुळे कोणतीही संशयास्पद हालचाल तात्काळ ओळखून आवश्यक ती कार्यवाही करता येईल. प्रायोगिक तत्वावर राबविण्यात आलेल्या या प्रकल्पात मुंबई, ठाणे, रायगड आणि पालघर विभागांतील ६४ महत्त्वाच्या ठिकाणी सीसी टीव्ही प्रणाली यशस्वीरित्या बसविण्यात आली आहे. उर्वरित २७ विभाग, तसेच विविध कार्यशाळा आणि कार्यालयांमध्ये सीसी टीव्ही कॅमेरे बसविण्याची पुढील कार्यवाही सध्या वेगाने सुरू आहे. या प्रकल्पामुळे एसटीच्या बसस्थानकांवर आणि कार्यालये सुरक्षित होतील. प्रवाशांचा विश्वास अधिक दृढ होणार असून कोणत्याही अनुचित घटनांवर त्वरित नियंत्रण ठेवणे शक्य होणार आहे. 'नवीन सीसी टीव्ही कॅमेरा प्रकल्प' हा केवळ कॅमेरे बसविण्याचा उपक्रम नसून, तो एसटीच्या सुरक्षेला डिजिटल कवच देणारा आणि प्रवाशांच्या विश्वासाला नवे बळ देणारा एक ऐतिहासिक टप्पा ठरणार आहे.

## शासकीय निमशासकीय अधिकारी-कर्मचारी संघटनेचे असहकार आंदोलन



प्रतिनिधी । जळगाव

**जय महाराष्ट्र शासकीय निमशासकीय अधिकारी-कर्मचारी संघटनेतर्फे दि. १६ ते २० फेब्रुवारीपर्यंत असहकारी आंदोलन पुकारण्यात आले आहे.**

या आंदोलनात चौथा वेतन आयोगापासून लिपीक वर्गीय संवर्गातील कर्मचारी वेतन त्रुटी दूर करावी यासह विविध मागण्यांसाठी संघटनेच्या माध्यमातून असहकार आंदोलन करण्यात येत आहे. या आंदोलनात जिल्हा पालक अध्यक्ष रविंद्र सोनवणे, जिल्हाध्यक्ष प्रमोद काळे, कार्याध्यक्ष अजित कुरकूटे, राजू सोनवणे, गिरीश चौधरी आदींची उपस्थिती होती.

## लायन्स क्लब ऑफ अमळनेरचा धुळे रीजन कॉन्फरन्समध्ये गौरव

प्रतिनिधी । अमळनेर

**धुळे येथील हॉटेल ऑर्चीड येथे नुकत्याच पार पडलेल्या लायन्स रीजन कॉन्फरन्समध्ये लायन्स क्लब ऑफ अमळनेर यांना उत्कृष्ट सेवा कार्य व उल्लेखनीय कामगिरीबद्दल तब्बल १३ ट्रॉफी, मेडल व प्रमाणपत्रांनी सन्मानित करण्यात आले. क्लबच्या विविध सामाजिक उपक्रमांची दखल घेत उत्कृष्ट क्लब म्हणून निवड करण्यात आल्याने सदस्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.**




यावर्षीचा ड्रीम प्रोजेक्ट म्हणून अवयवदान जनजागृती मोहिमेवर विशेष भर देण्यात आला. साने गुरुजी शाळेतील एका विद्यार्थ्याला वर्षभरासाठी दत्तक घेण्यासारखे उपक्रम राबविण्यात आले. या विविध प्रकल्पांमुळे क्लबला एकूण १३ पुरस्कार प्राप्त झाले.

या प्रसंगी ज्येष्ठ लायन्स सदस्य बजरंग अग्रवाल, योगेश मुंदडा, डॉ. युसूफ पटेल, विनोद अग्रवाल, डॉ. रवींद्र कुलकर्णी यांना विशेष ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले.

कॉन्फरन्सला रीजन चेअरमन चेतनभाई बर्दिया, डीजी अश्विनजी बजोरिया, पीडीजी गिरीशभाई शिसोदिया तसेच प्रमुख पाहुणे गिरीशभाई मालपानी उपस्थित होते. यावेळी अध्यक्ष डॉ. संदीप जोशी, सचिव महेंद्र पाटील, खजिनदार नितीन विचुरकर, प्रकाश जैन आदींसह असंख्य सदस्य उपस्थित होते.

# धरणगावात भीषण अग्नितांडव! लाखोंचे नुकसान

## तुटलेल्या विद्युत तारांमुळे शॉर्टसर्कीट ; भंगार गोडाऊन जळून खाक


प्रतिनिधी । धरणगाव

**शहरातील चोपडा रस्त्यालगत असलेल्या औद्योगिक वसाहतीत भंगार गोडाऊनला अचानक लागलेल्या आगीने काही क्षणांतच रौद्ररूप धारण करत आकाशाला भिडणाऱ्या ज्वाळा उसळल्या. दाट धूर, जळणाऱ्या साहित्याचा तीव्र वास आणि सायरनचा कर्कश आवाज या सर्वांनी परिसरात भीतीचे आणि चिंतेचे सावट पसरले. आगीत प्रचंड नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.**



प्रत्यक्षदर्शींच्या मते, गोडाऊन परिसरातून प्रथम धूर निघताना दिसला. काही मिनिटांतच आगीने भीषण रूप घेत संपूर्ण गोडाऊनला कवेत घेतले. गोडाऊनमध्ये साठवलेले भंगार साहित्य, प्लास्टिक व इतर वस्तूंमुळे आगीचा वेग प्रचंड वाढला. ज्वाळांची तीव्रता इतकी होती की, नागरिकांमध्ये काही काळासाठी घबराटीचे वातावरण निर्माण झाले. घटनेची माहिती मिळताच नगरपालिकेचे कार्यालयीन अधीक्षक भिकन पारधी यांनी तत्काळ हालचाली करत अग्निशमन दलाला पाचारण केले व परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन एरंडोल, पारोळा आणि अमळनेर येथील अग्निशमन दलाची पथके घटनास्थळी दाखल झाली. धरणगाव अग्निशमन दलाचे फायर इन्चार्ज संतोष बिऱ्हाडे, शहर समन्वयक निलेश वाणी, फायरमॅन रवींद्र वाघमारे, तसेच एरंडोल अग्निशामकचे फायरमॅन किरण पाटील, आनंद चौधरी, ड्रायव्हर संजय पाटील, अमळनेर अग्निशामकचे ड्रायव्हर जाफर पठाण, फायरमॅन दिनेश बिराडे, भिका संदानशीव, पारोळा अग्निशामकचे फायरमॅन लतीफ शेख, विशाल पाटील यासह पालिकेचे मुकादम अण्णा माळी, समशोद्दीन शेख, संजय महाजन, रामकृष्ण माळी, सुखदेव पचेरवार, दीपक वाघमारे आदींनी जीवाची पर्वा न करता आगीशी झुंज दिली. अनेक तासांच्या अथक प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले. अग्निशमन दलाच्या धाडसी कामगिरीमुळे मोठा अनर्थ टळला. या दुर्घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही, हीच सर्वात मोठी दिलासादायक बाब ठरली. मात्र गोडाऊनमधील मोठ्या प्रमाणावरील लाखोंच्या किमतीचे भंगार साहित्य जळून खाक झाले असून मालमत्तेचे प्रचंड नुकसान झाले आहे. प्राथमिक अंदाजानुसार नुकसानाची रक्कम लाखोंमध्ये असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, आगीचे कारण शॉर्टसर्कीट असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

सदरील जागेचे व भंगार दुकानाचे मालक सुरेश भास्कर महाजन (रा. धरणगाव) यांच्या खाजगी जागेवरून गेलेल्या विद्युत वाहक तारांपैकी एक तारा तुटून शॉर्टसर्कीट झाल्याचे प्राथमिक चौकशीत दिसून आले. तसेच जागेचे व गोडाऊनचे मालक सुरेश भास्कर महाजन यांनी आगीचे कारण सांगितले. यावेळी परिसरात नागरिकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती. प्रशासनाने तातडीने परिसर सुरक्षित करून परिस्थिती नियंत्रणात आणली. ही घटना पुन्हा एकदा औद्योगिक वसाहतीतील विद्युत सुरक्षा व्यवस्थेचा गंभीर प्रश्न ऐरणीवर आणणारी ठरली आहे. योग्य सुरक्षा उपाययोजना, विद्युत तारांची नियमित तपासणी आणि देखभाल किती आवश्यक आहे, याची जाणीव या भीषण दुर्घटनेने करून दिली आहे.



हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी (मोबा.- ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✲ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (✲ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# कचरा निर्मूलन वेळेवर, शिस्तबद्ध पद्धतीने करा; अन्यथा कारवाई

## महापौरांचा भेटीचा धडाका सुरूच ; घंटागाडी केंद्रावरील कर्मचाऱ्यांच्या जाणून घेतल्या व्यथा

प्रतिनिधी । जळगाव



**शहरातील विकास कामांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी जळगाव शहर महानगरपालिकेच्या महापौर दीपमाला काळे यांनी दि. १७ फेब्रुवारी रोजी सकाळी पुन्हा एकदा भेटीचा धडाका कायम ठेवला आहे.**

महापालिकेच्या जुन्या टीबी हॉस्पिटल परिसरातील घंटागाडी केंद्राला त्यांनी अचानक भेट देऊन तेथील कामकाजाची पाहणी केली. यावेळी महापौरांनी थेट कर्मचाऱ्यांशी संवाद साधला असता, कर्मचाऱ्यांनी समस्यांचा पाढाच महापौरांसमोर वाचला. केंद्रावरील पाहणीदरम्यान महापौरांना अनेक त्रुटी आणि कर्मचाऱ्यांच्या गंभीर अडचणी दिसून आल्या.

वाहनांमध्ये डिझेल नेहमी कमी असते, कॉन्ट्रॅक्टर वेळेवर उपस्थित नसतो आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे कर्मचाऱ्यांना पगार वेळेवर मिळत नाही. अनेकदा लागणारा दंड आमच्या पगारातूनच भरला जातो, अशी तक्रार कर्मचाऱ्यांनी केली. शहरात घंटागाडी काही ठिकाणी येते तर काही ठिकाणी जात नाही, अशा तक्रारींवर महापौरांनी विचारणा केली असता कर्मचाऱ्यांनी तांत्रिक अडचणी सांगितल्या.

कचरा खाली करण्यासाठी कॉम्पॅक्टर यंत्राकडे जावे लागते, तिथे वाहन रिकामे होण्यासाठी खूप वेळ लागतो. या रांगेमुळे नियोजित कॉलनीमध्ये कचरा संकलनासाठी वेळेवर पोहोचता येत नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी वाहनांच्या उपलब्धतेबाबतची माहितीही समोर आली. शहरात सध्या ८३ जुन्या आणि २१ नवीन अशा एकूण १०४ घंटागाड्या आहेत. त्यापैकी ८८ गाड्या प्रत्यक्ष कार्यरत आहेत. तर १६ गाड्या ब्रेक डाऊन स्थितीत आहेत. ७ जुने आणि ६ नवीन असे एकूण १३ कॉम्पॅक्टर असून त्यातील ८ सध्या सुरू आहेत. याशिवाय ९ पिकअप, ६ डम्पर आणि ३ स्किप लोडर अशी यंत्रणा शहरात तैनात आहे.

या सर्व प्रकाराची दखल घेत महापौर दीपमाला काळे यांनी बीव्हीजी कंपनीचे प्रोजेक्ट हेड विनोद रेड्डी यांच्याकडून कामाचा जाब विचारला. शहरातील कचरा निर्मूलन वेळेवर आणि शिस्तबद्ध पद्धतीने झालेच पाहिजे. कामे जर वेळेवर झाली नाहीत, तर प्रसंगी तुमच्यावर कठोर कारवाई केली जाईल, असा कडक इशारा महापौर दीपमाला काळे यांनी दिला. शहराची स्वच्छता राखण्यासाठी मला घंटागाडी केंद्रामध्ये शिस्त लावावी लागेल, असा दमही त्यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांना दिला.

# साईनगरच्या महिलांनी साकारले लोकवर्गणीतून भव्य मंदिर





प्रतिनिधी । जळगाव

**● साईभक्त महिला मंडळाचा पुढाकार; एकाच मंदिरात रामदरबार, गणपती, शिवलिंगासह ९ मूर्तींची स्थापना**

खोटेनगराजवळी साईनगर परिसरातील नागरिकांनी एकत्र येऊन लोकवर्गणीतून मंदिर उभाणीचा संकल्प केला. ज्येष्ठ नागरिक, महिला आणि बालकांसाठी हक्काचे विरंगुळ्याचे आणि भक्तीचे केंद्र असावे या ध्येयातून अडीच वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या साई भक्त महिला मंडळाच्या परिश्रमाला अखेर यश आले आहे. लोकवर्गणीतून महापालिकेच्या ५ हजार स्केअर फूट खुल्या भूखंडावरील ६०० स्केअर फूट जागेत लोकवर्गणीतून नीलकंठेश्वर महादेवाच्या भव्य मंदिराची उभारणी करण्यात आली.

साई नगरातील सुमारे १०० महिलांच्या पुढाकाराने मे २०२३ मध्ये महापालिकेच्या खुल्या भूखंडावर नीळकंठेश्वर महादेव मंदिराच्या बांधकामासाठी भूमिपूजन करण्यात आले होते. साई भक्त महिला मंडळाची स्थापना करून महिलांनी मंदिरासाठी लोकसहभागातून निधी उपलब्ध करून तीन वर्षात येथे नीलकंठेश्वर महादेव मंदिर पूर्णत्वास आले आहे. मंदिराचा कलशारोहण सोहळा १२ ते १६ फेब्रुवारी दरम्यान जल्लोषात पार पडला. भाविकांना एकाच मंदिरात राम, लक्ष्मण, सीता, हनुमान (राम दरबार), महादेवाची पिंड, नंदी, गणपती, दुर्गा माता, राधा-कृष्ण अशा एकूण ९ मूर्तींची भक्ती करता येणार आहे. आगामी काळात मंदिराच्या परिसरात गो-शाळा, ओपन जीम, नाना-नानी पार्क उभारण्याचा मानस साई भक्त महिला मंडळाचा असल्याचे अध्यक्षा शोभाबाई चौधरी व प्रवीण चौधरी यांनी व्यक्त केला. मंदिर जमिनीपासून सुमारे ३१ फूट उंच असून मंदिरावर ५ फुटांचा पंचधातूचा कळस आहे. मंदिरात जयपूर येथून आणलेल्या नऊ मूर्ती म्हणजे शक्ती-भक्तीचे प्रतिक आहेत. या मूर्ती जयपूर येथील श्रवणकुमार यांनी घडविल्या असून त्यांनी नंदुरबार येथे २१ फूट उंच रामाची मूर्ती साकारली आहे.

## थोडक्यात

### भरधाव कारने दुचाकीला उडविले; एक ठार

**मुक्ताईनगर ।** येथील भुसावळ रोडवरील हॉटेल महिंद्रा फाट्याजवळ असलेल्या हनुमान मंदिरासमोर आज, गुरुवारी दुपारी भीषण अपघात झाला. भरधाव वेगाने येणाऱ्या एका इनोवा कारने दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात दुचाकीवरील एका तरुणाचा जागीच मृत्यू झाला असून दोन जण गंभीर जखमी झाले आहेत.

### काम सुधारा, अन्यथा कारवाई अटळ

**जळगाव ।** शहरातील स्वच्छतेचा प्रश्न आणि रखडलेली विकासकामे मार्गी लावण्यासाठी महापौर दीपमाला काळे सध्या आक्रमक भूमिकेत दिसत आहेत. मंगळवारी, १७ फेब्रुवारी रोजी सकाळी महापौरांनी जुन्या टीबी हॉस्पिटल परिसरातील घंटागाडी केंद्राला अचानक भेट देऊन कामकाजाची पाहणी केली.

# पार्सल आल्याचा बनाव रचून २० लाखांच्या खंडणीसाठी व्यापाऱ्यासह भाच्याचे अपहरण

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव पोलिसांची अकोल्यात धाडसी कारवाई; खंडणीखोर दोघा तरुणांना पोलिसांनी ठोकल्या बेड्या**



**शहरातील गोलाणी मार्केटमधील मोबाईल साहित्य विक्रेता व त्याचा भाचा यांना राजस्थानहून पार्सल आल्याचा बनाव रचून त्याच्या भाच्याचे अपहरण केल्याची घटना जळगावात उघडकीस आली आहे. २० लाख रुपयांच्या खंडणीसाठी मामा-भाचा या दोघांना अकोला येथे डांबून ठेवण्यात आले होते. मात्र, जळगाव पोलिसांनी तपास चक्रे वेगाने फिरवत आरोपींना अकोल्यातून अटक करण्यात आली आहे. व्यापाऱ्याने दाखवलेले प्रसंगावधान आणि पोलिसांनी अवघ्या काही तासांत केलेली कारवाई यामुळे मोठा अनर्थ टळला.**

जळगाव शहरातील गोलाणी मार्केटमधील मोबाईल साहित्य विक्रेते कृष्णकुमार चौधरी आणि त्यांचा भाचा गणपतलाल माळी हे १५ फेब्रुवारीच्या रात्री घरी जात असताना हा प्रकार घडला. मुख्य संशयित आरोपी यश जितेंद्र माकोडे याने तुमचे राजस्थानवरून पार्सल आले आहे, असे सांगून भाचा गणपतलाल याला ममुराबाद रस्त्यावरील एका इमारतीत बोलावून घेतले. तिथे गेल्यावर गणपतलाल यास बांधून ठेवून चाकूचा धाक दाखवण्यात आला. त्यानंतर मामा कृष्णकुमार यांनाही तिथे बोलावून घेत दोघांनाही शस्त्राचा धाक दाखवून डांबून ठेवले. तू मला मारण्याची सुपारी दिली आहेस, असा बनाव रचून आरोपीने दोघांनाही दुचाकीवरून नेले. यावेळी एका अल्पवयीन मुलाचीही मदत घेण्यात आली. दोघांनाही अकोला येथे नेल्यानंतर, भाच्याला सोडवण्यासाठी आरोपीने २० लाख रुपयांच्या खंडणीची मागणी केली. पैसे आणण्यासाठी आरोपीने मामा कृष्णकुमार यांना जळगावात परत पाठवले. मात्र, घाबरून न जाता कृष्णकुमार यांनी थेट शनिपेठ पोलीस स्टेशन गाठले आणि आपबिती कथन केली. या घटनेचे गांभीर्य ओळखून शनिपेठ पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तातडीने अकोल्याच्या दिशेने तपासचक्र फिरवली. रविवारी पहाटे पोलिसांनी सापळा रचून आरोपींना बेड्या ठोकल्या आणि अपहृत तरुणाची सुटका केली. अटक करण्यात आलेल्यांमध्ये एका अल्पवयीन मुलाचाही समावेश आहे.

# दूध विक्री केंद्राला लागलेल्या आगीत साहित्य जळून खाक

प्रतिनिधी । जळगाव

**बंद असलेल्या दूध केंद्राला आग लागून त्यातील पाच फ्रीजसह जवळपास पाच लाख रुपयांचे साहित्य जळून खाक झाले. ही घटना रविवारी रात्री १२ वाजेच्या सुमारास भोईटेनगर रेल्वे गेट परिसरातील आनंदनगर सहकारी गृहनिर्माण संस्थेजवळ घडली. मनपाच्या अग्निशमन विभागाच्या बंबाने आगीवर नियंत्रण मिळवले.**

शहरातील भोईटेनगर रेल्वे गेट परिसरात विशाल अरुण मंडोरे यांचे विकास दुधाचे केंद्र आहे. रविवारी रात्रीच्या सुमारास ते दुकान बंद करून घरी गेले. दरम्यान, रात्री १२ वाजेच्या सुमारास अचानक दुकानास आग लागली. क्षणात आगीचा मोठा भडका उडाला व त्यात पाच फ्रीज, विक्रीसाठीचे खाद्य पदार्थ, दूध, दुग्धजन्य पदार्थ व इतर सर्व साहित्य तसेच दुकानात असलेले काही पैसे जळून खाक झाले. आगीत मोठे नुकसान झाले.

# ज्ञानेश्वर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उभारले शिवरायांचे किल्ले

प्रतिनिधी । जळगाव



येथील श्री संत ज्ञानेश्वर प्राथमिक व माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी शिवरायांचे भव्य किल्ले उभारले. छ.शिवाजी महाराज जयंती निमित्त इयत्ता पहिली-दुसरीच्या विद्यार्थ्यांनी आकर्षक किल्ले साकारले.

श्री संत ज्ञानेश्वर प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात इयत्ता पहिली व दुसरीच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी सर्जनशीलतेचा सुंदर आविष्कार सादर केला. कार्डबोर्ड व इतर पुनर्वापर करता येणाऱ्या साहित्याच्या साहाय्याने विद्यार्थ्यांनी आकर्षक व भव्य किल्ल्यांच्या प्रतिकृती तयार केल्या. लहान वयातही विद्यार्थ्यांनी बुरूज, तटबंदी, दरवाजे तसेच भगवे ध्वज यांची कल्पक मांडणी करून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. प्रत्येक किल्ल्यातून शिवकालीन वैभवाची झलक पाहायला मिळाली. हा उपक्रम मुख्याध्यापक मुकेश नाईक व पर्यवेक्षक निलेश पवार यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. त्यांच्या प्रेरणेमुळे विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाबद्दलची आवड, देशभक्तीची भावना व सर्जनशीलतेचा विकास घडून आला. या उपक्रमामुळे शाळेचा परिसर देशभक्तीच्या आणि आनंदाच्या वातावरणाने भारावून गेला होता.

# राजर्षी शाहू महाराज सांस्कृतिक बहुउद्देशीय संस्थेतर्फे नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार

प्रतिनिधी । जळगाव




**राजर्षी शाहू महाराज सांस्कृतिक बहुउद्देशीय संस्था शाहूनगर जळगावतर्फे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त दि.१५ फेब्रुवारी रोजी शाहूनगर येथे जगण्याचे सूत्र शिवचरित्र ह्या विषयावर लेखक रविंद्र तुकाराम पाटील यांचे व्याख्यान आयोजित केले होते.**

यावेळी माजी नगराध्यक्ष बंडुदादा काळे यांचे स्वागत संस्थेचे उपाध्यक्ष विजय वाडकर यांनी केले. यावेळी नगरसेवक दीपक सुर्यवंशी, अमित काळे, विजय बांदल, ॲड सुचिता हाडा, अर्शीन बानो खाटीक आदी उपस्थित होते. यावेळी नवनिर्वाचित महापौर दीपमाला काळे, नगरसेवक दीपक सूर्यवंशी, अमित काळे, विजय बांदल, ॲड.सुचिता हाडा, अर्शीन बानो शोएब खाटीक या नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बाल शाहीर राजवीर प्रतीक आरडे याने सुंदर असा पोवाडा साजरा केला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे उपाध्यक्ष तथा माजी नगरसेवक विजय वाडकर, अशोक जाधव, प्रमोद वाणी, नारायण टेकावडे, शरद टेकावडे, संजय साळुंखे, संतोष शेळके, भिकन भोई, कैलास तिवारी, सुरेश भगत, जितेंद्र टेकावडे, सागर पोळ, हरेश्वर कोयते, तानाजी मानकुबेर, अशोक गायकवाड, शिवाजीराव मुळीक, वसंत गायकवाड, दिलीप रणशिंगे, दत्तात्रय माने, मयूर मुळीक, शुभम वाडकर, गोलू रणशिंगे, दर्शन टेकावडे आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय दुसाने यांनी केले. आभार सार्थक टेकावडे यांनी मानले.

# विद्यार्थ्याला मारहाणीची घटना सीसीटीव्हीत कैद

प्रतिनिधी । जळगाव

**शहरापासून जवळच असलेल्या गुलाबराव देवकर बी फार्मसी कॉलेजच्या दुसऱ्या वर्षाला शिकत असलेल्या विद्यार्थ्याने रविवारी नेहरूनगरातील रूमवर गळफास घेऊन आत्महत्या केली. श्याम प्रभाकर पाटील (१९, रा. बोदवड) असे या विद्यार्थ्याचे नाव असून त्याच्या खिशात झालेल्या प्रकाराची सुसाइड नोट मिळून आली. त्यातून प्राचार्यांच्या मारहाणीमुळे आत्महत्या केल्याचे समोर येत आहे.**

याबाबत माहिती अशी की, प्रभाकर पाटील (रा. मोताळा, बुलडाणा, मूळचा राहणार बोदवड, जि. जळगाव) यांना राम व श्याम ही दोन जुळी मुले. राम हा बोदवड येथे शेती व बीएस्सीचे शिक्षण घेतो, तर श्याम जळगावातील शिरसोली रस्त्यावर असलेल्या गुलाबराव देवकर कॉलेज ऑफ फार्मसी येथील फार्मसीचे द्वितीय वर्षात शिक्षण घेत होता. तो नेहरूनगरात रूम करून राहत होता. शनिवारी (१४ रोजी) त्याचे कॉलेजमधील एका मुलासोबत भांडण झाले. त्याबाबत प्राचार्य योगेश पवार यांच्याकडे जाऊन सांगितल्यावर प्राचार्य पवार यांनी श्याम या एकट्याला पीव्हीसी पाइपने मारहाण केली. माझी काही चूक नव्हती पापा, याच्यामध्ये या वेळेस. मला आधी काही माहिती पण नव्हती. फक्त माझ्या मित्रांचे भांडण चालू होते. त्यात मी पडलो आणि त्याच्यानंतर त्या एका मुलाने माझी कॉलर पकडली. त्यासाठी मी प्रिन्सिपल सरांकडे गेलो होतो आणि सरांना मी हे सांगितल्यानंतर मला खूप मारले, असे सुसाईट नोटमध्ये म्हटले आहे.

# दहावीच्या विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने परीक्षा द्यावी

## ● पाचोरा येथे संचालक सहविचार सभेत गटशिक्षणाधिकारी विजय पवार यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी । पाचोरा

**विद्यार्थ्यांनी गैरमार्गाचा अवलंब न करता आत्मविश्वासाने परीक्षा द्यावी, असे आवाहन पाचोरा गटशिक्षणाधिकारी तथा परीरक्षक विजय पवार यांनी केले.**



शिक्षण विभाग पंचायत समिती पाचोरा अंतर्गत तेरा परीक्षा केंद्रावर इयत्ता दहावीची राज्य मंडळाची परीक्षा होणार आहे. चार हजार पाचशे पंचवीस विद्यार्थी प्रविष्ट झालेले आहेत. सदर परीक्षा केंद्र संचालक व सहाय्यक परीरक्षक यांची सहविचार सभा पाचोरा गटशिक्षणाधिकारी तथा परीरक्षक विजय पवार यांनी आयोजित केली होती. गो. से.विद्यालयात झालेल्या या सभेत परीक्षा आयोजनाचा आढावा घेऊन सूचना देण्यात आल्या. सर्व परीक्षा केंद्रावर सिसिटीव्ही बसवण्यात आले आहेत. त्यासोबत प्रत्येक वर्गात झूम अँपद्वारे संनियंत्रण करण्यात येणार आहे. तालुका नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात आला असून तेथून थेट केंद्रावर लक्ष ठेवणार आहे. तसेच परीक्षा सुरळीत होईल, यासाठी नियोजन करण्यात आल्याचे गटशिक्षणाधिकारी विजय पवार यांनी सांगितले. तालुकास्तरावर दोन भरारी पथक आणि तेरा बैठे पथक नियुक्त करण्यात आले आहे. महसूल विभागाचे स्वतंत्र बैठे पथक यावर्षी नेमण्यात आले आहे.

**➤ तहसीलदार विजय बनसोडे व गटविकास अधिकारी सुधाकर मुंढे हे परीक्षा केंद्राना भेटी देणार आहेत. सदर परीक्षा नियंत्रणकामी कैलास बडगुजर, दिलीप अहिरे, नितीन भालेराव, केंद्र प्रमुख अनिल पाटील, सीमा पाटील, जयदीप पाटील, सुनील शिवदे, गिरीश भोयर, सतीश पाटील, संजय पाटील इत्यादी कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. सभेचे प्रास्ताविक भागवत कोरे यांनी केले. आभार राजू सूर्यवंशी यांनी मानले.**

### लिपीक टंकलेखक पदभरती १४ मार्च रोजी परीक्षा

प्रतिनिधी । जळगाव

सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे व विभागाच्या अधिपत्याखालील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयांमधील लिपीक टंकलेखक (गट-क) पदासाठी एकूण ७२ रिक्त जागा असून या पदाकरिता भरती प्रक्रिया टिसीएस-आयओएन यांच्या मार्फत राबविण्यात येत आहे. या पदभरतीसाठीची ऑनलाईन परीक्षा येत्या १४ मार्च रोजी दुपारी १ ते ३ या वेळेत आयोजित करण्यात येणार आहे. याबाबतची माहिती जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी संजय रामराव गायकवाड यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

# चोपड्यात प्रलंबित मागण्यांसाठी शासकीय कर्मचाऱ्यांचा एल्गार

## राज्यव्यापी सहकार व कामबंद आंदोलनास सुरुवात

प्रतिनिधी । चोपडा

**विविध प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी जय महाराष्ट्र शासकीय निमशासकीय अधिकारी व कर्मचारी संघटनेच्या वतीने १६ फेब्रुवारीपासून राज्यभर असहकार व कामबंद आंदोलन सुरू करण्यात आले आहे. त्याच पार्श्वभूमीवर चोपडा येथील पंचायत समिती (पं.स.) आवारात लिपिक वर्गीय कर्मचाऱ्यांनी एकत्र येत शासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली.**



आंदोलनाच्या पहिल्या टप्प्यात दि.१६ व १७ फेब्रुवारी रोजी कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून काम करत निषेध नोंदविला. यावेळी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्या वतीने सहाय्यक प्रशासन अधिकारी ईश्वर जाधव यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. शासनाने दीर्घकाळ प्रलंबित प्रश्नांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप करत कर्मचाऱ्यांनी तातडीने सकारात्मक निर्णय घेण्याची मागणी केली. संघटनेचे राज्याध्यक्ष अशोक डहाळे यांच्या सूचनेनुसार आंदोलनाची टप्प्याटप्प्याने रूपरेषा निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार दि.१८ फेब्रुवारी रोजी कार्यालयासमोर शांततापूर्ण घोषणा देण्यात येणार आहेत.दि.२०फेब्रुवारी रोजी सादर केलेल्या निवेदनाचा पाठपुरावा करण्यात येईल. मात्र, शासनाकडून ठोस प्रतिसाद न मिळाल्यास दि.२३ फेब्रुवारीपासून बेमुदत संपूर्ण कामबंद आंदोलन छेडण्यात येणार असल्याचा इशारा संघटनेने दिला आहे. या आंदोलनामुळे पंचायत समितीतील दैनंदिन प्रशासकीय कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. विविध शासकीय योजना, कागदपत्रे व नागरिकांची कामे प्रलंबित राहण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे. तरीही कर्मचाऱ्यांनी आपल्या मागण्यांसाठी संघर्ष करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

● आंदोलनात धर्मेंद्र सूर्यवंशी, नितीन बिरारी, अनिता पाटील, संदीप पाटील, ज्योत्स्ना सनेर, गिरीश पाटील, गुणवंत देवराज, विजय झांबरे, नीलिमा बिऱ्हाडे, निराशा पाटील, रमाकांत खैरनार, विजेंद्र मोरे, तडवी मॅडम आदी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कर्मचाऱ्यांच्या एकजुटीमुळे आंदोलनाला जोरदार प्रतिसाद मिळाला असून शासनाने तातडीने दखल घेऊन सकारात्मक निर्णय न घेतल्यास पुढील काळात आंदोलन अधिक तीव्र करण्याचा निर्धार संघटनेने व्यक्त केला आहे.

# हातेड खुर्द येथे आज कीर्तनासह मोफत नेत्र शस्त्रक्रिया शिबीर

● कै. लक्ष्मणराव पाटील व कै. पितांबर दाजभाऊ स्मृतिदिनानिमित्त आयोजन

प्रतिनिधी । चोपडा



**तालुक्यातील हातेड खुर्द येथे कै. आप्पासो. लक्ष्मणराव पांडुरंग पाटील व कै. पितांबर दाजभाऊ यांच्या स्मृतिदिनानिमित्त बुधवार, दि. १८ फेब्रुवारी रोजी धार्मिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.**

यानिमित्ताने रात्री ८ वाजता भव्य कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून सकाळी मोफत मोतीबिंदू व नेत्रतपासणी शिबिर पार पडणार आहे. कीर्तनासाठी पंढरपूर क्षेत्राचे मठाधिपती ह.भ.प. गोविंद महाराज चौधरी (वरसाडेकर) यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. त्यांच्या रसाळ कीर्तनातून भक्ती, संस्कार व समाजप्रबोधनाचा संदेश दिला जाणार आहे. भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. तसेच सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत श्री विठ्ठल-रुख्माई मंदिराच्या प्रांगणात मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया व डोळ्यांच्या दुर्धर आजारांवरील तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे. ना. गुलाबराव पाटील सोशल फाऊंडेशन (पाळधी), संकल्प सेवा फाऊंडेशन (धनवाडी) व आर. झुंझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल, पनवेल (नवी मुंबई) यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

**शिबिरासाठी येणाऱ्या रुग्णांनी आधार कार्ड व रेशन कार्डच्या झेरॉक्स प्रती सोबत आणाव्यात. रक्त पातळ करणारी औषधे किंवा मधुमेहावरील उपचार सुरू असल्यास संबंधित कागदपत्रे व औषधे आणावीत. तपासणीसाठी उपाशीपोटी यावे. निवड झालेल्या रुग्णांसाठी पनवेल येथे मोफत प्रवास व रुग्णालयात भोजनाची व्यवस्था करण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे परिसरातील गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळणार असून नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक नरेंद्र पितांबर बाविस्कर, धर्मराज लक्ष्मणराव बाविस्कर व अभय भिकनराव बाविस्कर यांनी केले आहे.**

## थोडक्यात

### वराडसिम उपसरपंचपदी लक्ष्मी डोळसे बिनविरोध

**भुसावळ ।** तालुक्यातील वराडसिम येथे उपसरपंचपदाची निवडणूक दि.१६ रोजी घेण्यात आली. यावेळी लक्ष्मी विजय डोळसे यांनी नामनिर्देशन पत्र भरले. मात्र दुसरे कोणाचेही नामनिर्देशन नसल्याने मतदानाची प्रक्रिया न होता. २.३० वाजता लक्ष्मी विजय डोळसे यांची बिनविरोध निवड ग्रामविकास अधिकारी संतोष मोरे व सरपंच नीलप्रभा पाचपांडे यांनी घोषित केली. यावेळी ग्रा. पं. सदस्य वैशाली झारखंडे, प्रकाश ठाकूर, शरद सपकाळे आदी सदस्य उपस्थित होते.

### महाशिवरात्रीनिमित्त श्रीराम मंदिरात कार्यक्रम

**भुसावळ ।** येथील श्रीराम मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त सरिता चौक यांच्या हस्ते रविवारी सकाळी पूजा व अभिषेक महाआरती करून प्रसाद वाटप करण्यात आला. यावेळी राधेश्याम लाहोटी, जे.बी. कोटेचा, गोपाल चांडक, विनोद शर्मा, सत्यनारायण शर्मा, अनुप अग्रवाल, दिलीप लोंढे, सुभाष शिरसाळे, राजू गुरव, गणेश गुरव, शुभम गुरव, प्रशांत भोंडे, रामचंद्र गचके, विमल कोटेचा, अरुणा अग्रवाल, धनश्री जोशी, विशाखा नाईक, कविता नाईक, आदी भाविकांची उपस्थित होती.

# श्री क्षेत्र नाटेश्वर मंदिरात महाशिवरात्रीला शिव-पार्वती विवाहसोहळा उत्साहात

प्रतिनिधी । चोपडा

**लासुर येथील श्री क्षेत्र नाटेश्वर मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त शिवपार्वती विवाहसोहळा मोठ्या भक्तिभावात व उत्साहात साजरा करण्यात आला. पहाटेपासूनच मंदिर परिसरात भाविकांची गर्दी उसळली होती. साबुदाणा-दूध व केळीचा महाप्रसाद आयोजित करण्यात आला होता. गावातील तसेच परिसरातील भाविकांनी श्री नाटेश्वर भगवंताचे दर्शन घेत महाशिवरात्रीचा पुण्यलाभ मिळवला.**

संध्याकाळी लासुर येथे शिवशंकर महादेव व पार्वतीमातेच्या स्वयंवराची मिरवणूक काढण्यात आली. नंदी, महादेव, श्रीराम-लक्ष्मण, महाबली हनुमान व वानरसेनेचे आकर्षक देखावे साकारण्यात आले होते. ढोल-ताशांच्या गजरात



आणि 'हर हर महादेव'च्या जयघोषात संपूर्ण गाव भक्तिरसात न्हाऊन निघाले. मंदिरात पार्वती मातेची विधिवत पूजा करून शिवपार्वती विवाहसोहळा पारंपरिक पद्धतीने संपन्न झाला. या सोहळ्यास परिसरातील सर्व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाशिवरात्रीचा हा उत्सव लासुरकरांसाठी भक्ती, एकात्मता आणि सांस्कृतिक परंपरेचे प्रतीक ठरला.

# कमी गुणांची सल आयुष्यभर राहते : मुख्याधिकारी झंवर

## ● महिला मंडळ शाळेत दहावीच्या विद्यार्थ्यांना भावपूर्ण निरोप

प्रतिनिधी । चोपडा

क्रिकेटच्या सामन्यात कॅच सोडणे म्हणजे केवळ एक चूक नसते, तर ती संपूर्ण मॅच सोडण्यासारखी असते. आयुष्यात येणारी संधी कधीही दवडू नका. कमी गुणांची सल आयुष्यभर मनाला टोचत राहते, असे प्रेरणादायी मार्गदर्शन चोपडा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी रामनिवास झंवर यांनी केले.



येथील महिला मंडळ माध्यमिक विद्यालयात इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांच्या सदिच्छा व निरोप समारंभात ते बोलत होते. विद्यार्थ्यांच्या जीवनातील परीक्षा हा तणावाचा नव्हे तर आनंदाचा आणि स्वतःला सिद्ध करण्याचा टप्पा आहे, असे सांगत त्यांनी क्रिकेटमधील उदाहरणांद्वारे विद्यार्थ्यांना संधीचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून प्रा. रमेश वाघजाळे उपस्थित होते. संस्थेच्या अध्यक्षा पुनम गुजराथी, उपाध्यक्षा छाया गुजराथी, सहसचिव अश्विनी गुजराथी, मुख्याध्यापक सुनील पाटील, पर्यवेक्षक विजय पाटील व विविध विभागप्रमुख मंचावर उपस्थित होते. प्रा.रमेश वाघजाळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना गरिबी, ग्रामीण पार्श्वभूमी किंवा विषयाची भीती यांसारख्या न्यूनगंडातून बाहेर पडण्याचे आवाहन केले. यश बुद्धीच्या योग्य वापरावर अवलंबून असते. स्वप्ने मोठी ठेवा, प्रयत्नांना धार द्या. मोबाईल व मोटारसायकलच्या आकर्षणापासून दूर राहून चांगली संगत ठेवा, असा सल्ला त्यांनी दिला. कार्यक्रमात वैष्णवी पाटील, कनक नहाले, खुशी पाटील, पियूष बारी तसेच संजय बारी यांनी मनोगते व्यक्त केली. मागील वर्षी दहावीच्या परीक्षेत प्रथम तीन क्रमांकाने उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन अनिल महाजन यांनी केले.

प्रास्ताविक सुनील पाटील यांनी तर आभार प्रदर्शन चंद्रकांत चौधरी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# प्रभागातील नळ लिकेजची दुरुस्ती अन् क्रॉंक्रिटीकरणाच्या डागडुजीसाठी नगरसेवक सुनील चौधरींनी केली पदरमोड

प्रतिनिधी । धरणगाव

येथील नगरसेवक सुनील चौधरी यांचा कामाचा धडाका मोठ्याप्रमाणात सुरू आहे. प्रभाग ८ मधील रस्त्यावर पाइपलाइन लिकेज होत असून मोठ्याप्रमाणात पाण्याची नासाडी होत असल्याचा व्हिडिओ नागरिकांनी टाकून निदर्शनास आणून देताच सुनील चौधरी यांनी पदरमोड करून प्लंबर बोलावून पाइपलाइन दुरूस्ती करून घेतली. तसेच उखडलेल्या रस्त्यावर स्वखर्चाने क्रॉंक्रिटीकरण करून तत्काळ समस्या सोडवली. चौधरी यांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे पाण्याची नासाडी तर थांबलीच पण लिकेजमुळे प्रभागात होणारा दूषित पाण्याचा पुरवठा स्वच्छ होऊन नागरिकांच्या आरोग्याचेही रक्षण झाले



आहे. सुनील चौधरी यांच्यामुळे प्रभागातील समस्या तत्काळ सुटत आहेत. त्यामुळे सुनील चौधरींचे लाभार्थी वाढले आहे.

# चोपडा येथे महात्मा फुले जनआरोग्य शिबीर उत्साहात

प्रतिनिधी । चोपडा

**शहरातील मोमिन अली भागात गोरगरीब नागरिकांच्या आरोग्य समस्यांवर उपाययोजना करण्याच्या उद्देशाने श्री नृसिंह रुग्णालयाच्या सौजन्याने दि.१६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४ ते ६ या वेळेत महात्मा फुले जनआरोग्य शिबिर यशस्वीरित्या पार पडले. शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.**




या शिबिरात एकूण १०० रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये २५ पुरुष व ७५ महिलांचा समावेश होता. सर्व रुग्णांना मोफत औषधांचे वाटप करण्यात आले. तपासणीनंतर १५ रुग्णांची प्रकृती चिंताजनक आढळल्याने त्यांना पुढील उपचारांसाठी अन्य रुग्णालयात दाखल करण्यात आले.

शिबिरात डॉ. दिलीप पाटील, डॉ. कदम, डॉ.देवेंद्र यांच्यासह चार परिचारिका व एआरएम सागर पाटील यांनी सेवा बजावली. नगरसेवक भूपेंद्र गुजराथी व नगरसेविका शकिलाबी इसाख बागवान यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम साकारला. आयोजनासाठी स्थानिक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. नागरिकांनी या सामाजिक उपक्रमाचे स्वागत करत समाधान व्यक्त केले.

# शिवसेना जिल्हाप्रमुख समाधान महाजन यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

## आ.चंद्रकांत पाटील यांची प्रमुख उपस्थिती; जिल्हाभरातून शुभेच्छांचा वर्षाव

प्रतिनिधी । वरणगाव

**शिवसेनेचे रावेर लोकसभा विभागाचे जिल्हाप्रमुख समाधान महाजन यांचा वाढदिवस शनिवार, दि. १४ फेब्रुवारी रोजी वरणगाव येथे मोठ्या उत्साहात व जल्लोषात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला मुक्ताईनगरचे आमदार चंद्रकांत पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली. जिल्हाभरातील राजकीय, सामाजिक व विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी उपस्थित राहून महाजन यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.**





वाढदिवसानिमित्त दिवसाची सुरुवात पहाटे ५ वाजता श्री गजानन महाराज मंदिर, शेगाव येथे दर्शन घेऊन करण्यात आली. त्यानंतर सिरसाळा येथील मारुती मंदिरात सपत्नीक दर्शन घेऊन महाजन यांनी आशीर्वाद घेतला. सकाळी १० वाजता शिवसेना परिवारातर्फे वरणगाव ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना फळवाटप करण्यात आले. दुपारी १२ वाजता गंगाधर सांडू चौधरी विद्यालयात शिक्षकवर्गातर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. सायंकाळी ७ ते रात्री १०.३० वाजेपर्यंत अभिष्टचिंतन सोहळा पार पडला. कार्यक्रमाच्या व्यासपीठावर ज्येष्ठ शिवसैनिक विलास मुळे, तालुकाप्रमुख नवनीत पाटील, युवा सेना जिल्हाप्रमुख पंकज राणे, अल्पसंख्याक विभागाचे जिल्हाप्रमुख हिप्पी शेठ, अफसर खान, नगराध्यक्ष मीराबाई माळी, माजी नगराध्यक्ष हाजी सईद बागवान, नगरसेविका तृप्ता महाजन यांसह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. प्रास्ताविक संतोष माळी यांनी केले. महाजन कुटुंबीयांतर्फे औक्षण करण्यात आले. विविध मान्यवरांनी मनोगत व्यक्त करत महाजन यांच्या संघटन कौशल्याचा व कार्यतत्परतेचा गौरव केला. आमदार चंद्रकांत पाटील यांनी आपल्या भाषणात महाजन यांनी संघटना बळकट करून वरणगाव नगरपरिषदेत शिवसेनेचे पाच नगरसेवक निवडून आणले, ही त्यांच्या कार्याची पावती असल्याचे सांगितले. त्यांनी महाजन यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत भविष्यातील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन श्रद्धा देशमुख यांनी केले.

# तुटलेली मने सांधण्यासाठी महिला अन्याय विरोधी समितीत सहभागी व्हा! : धनंजय सोनार यांचे आवाहन

प्रतिनिधी । अमळनेर

**संसारातील किरकोळ वाद, पती-पत्नीतील मतभेद आणि न्यायालयीन प्रक्रियेत अडकून विस्कटलेल्या कुटुंबांना पुन्हा एकत्र आणण्यासाठी कार्यरत असलेल्या 'महिला अन्याय विरोधी समितीने राज्यभर आपला ठसा उमटविला आहे. आजवर शंभराहून अधिक तुटलेले संसार समुपदेशनाच्या माध्यमातून पुन्हा उभे करण्याचे उल्लेखनीय कार्य समितीने केले आहे.**

आता या सामाजिक उपक्रमाचा विस्तार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अमळनेरसह जळगाव, धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यातील सेवाभावी नागरिकांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



सध्याच्या धावपळीच्या जीवनशैलीत शुल्लक कारणांवरून वाढणारे वाद अनेकदा घटस्फोटापर्यंत पोहोचतात.

मात्र, कौटुंबिक समुपदेशनाद्वारे ही प्रकरणे शांततेत आणि समजुतीने मार्गी लावता येतात. त्यामुळे दोन्ही कुटुंबांची मानसिक व आर्थिक ओढाताण टाळता येते.

समितीच्या कार्यात सहभागी झाल्यास शास्त्रीय पद्धतीने समुपदेशनाचे कौशल्य आत्मसात करण्याची संधी मिळते, सामाजिक जाणीवा अधिक व्यापक होतात तसेच विखुरलेली कुटुंबे पुन्हा एकत्र आल्याचे आत्मिक समाधान लाभते. इच्छुक व्यक्तींना आपल्या परिसरात समितीची शाखा सुरू करण्याचीही संधी उपलब्ध आहे. या कार्यात रस असलेल्या सज्ञान महिला-पुरुषांनी अधिक माहितीसाठी समितीचे अध्यक्ष धनंजय सोनार (अमळनेर) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.